महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २१५ वा | दिनांक : २१/०६/२०२५ | वार : शनिवार

## इम्तियाज जलील यांच्याकडे कोट्यवधींची प्रॉपर्टी कुठून आली? - वंचित बहुजन आघाडीचा सवाल



**छत्रपती संभाजीनगर :** एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी नुकतेच राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्यावर मालमत्तेसंबंधीचे गंभीर आरोप केले होते. पण आता वंचित बहुजन आघाडीने जलील यांच्यावरच कोट्यवधी रुपयांची प्रॉपर्टी कमावल्याचा आरोप केला आहे. इम्तियाज जलील ५ वर्षे खासदार व ५ वर्षे आमदार होते. या १० वर्षांत त्यांच्याकडे कोट्यवधी रुपयांची प्रॉपर्टी कुठून आली? असा प्रश्न वंचितचे स्थानिक पदाधिकारी अफसर खान यांनी उपस्थित केला आहे.

अफसर खान म्हणाले की, इम्तियाज जलिल यांनी आपल्या पत्नीच्या नावाने खुलताबाद येथे १ कोटी रुपयांची प्रॉपर्टी घेतली आहे. विशेषतः ते पूर्वी राहत असलेल्या मन्नत क्रमांक एक हे घर कोट्यवधी रुपयांचे होते. पण त्यांनी ते केवळ ९५ लाखांत खरेदी केले. याशिवाय त्यांनी ते सध्या राहत असलेल्या मन्नत टू बंगल्यावरही कोट्यवधी रुपयांचा खर्च केला आहे. इम्तियाज जलील अनेकांना ब्लॅकमेल करतात. लोकांना भीती घालतात. त्यांना १ लाख रुपयांचे वेतन मिळते. त्यांनी २ कोटींचे घर अवघ्या ९५ लाखांत घेतले. घरावर २ कोटी खर्च केले. त्यांनी सिडको प्रशासनावर दबाव टाकून हे घर घेतले होते. अवघा १ लाख पगार असणाऱ्या जलील यांच्याकडे ३ वर्षांत ३ कोटी रुपये कुठून आले? त्यांच्या घराला केवळ ४ हजारांचा टॅक्स लागतो. पण त्यांना त्याहून अधिक कर लागला पाहिजे, असे अफसर खान म्हणाले. खान यांनी यावेळी इम्तियाज जलील यांनी केलेल्या विविध विकास कामांची चौकशी करण्याचीही मागणी केली.

दुसरीकडे, मंत्री संजय शिरसाट यांनी इम्तियाज जलील यांच्याविरोधात शेंद्रा औद्योगिक भूखंडासंबंधीच्या आरोपाप्रकरणी मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात फौजदारी दावा दाखल केला आहे. त्यावर २४ जून रोजी सुनावणी होणार आहे. शिरसाट यांनी आपल्या दाव्यात म्हटले आहे की, ते राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री आहेत. शिवसेनेच्या स्थापनेपासून ते सक्रिय पदाधिकारी आहेत. दोनवेळा नगरसेवक, चौथ्यांदा आमदार पदी निवडून आले आहेत. माजी खा. सय्यद इम्तियाज जलील यांनी ५ जून रोजी पत्रकार परिषदेत शिरसाट यांनी मद्य कारखान्यासाठी पुत्र सिद्धांत यांच्या नावे शेंद्रा एमआयडीसीतील भूखंड घेतला. सत्तेचा गैरवापर करीत आरक्षण बदलून त्यांना हा भूखंड घेतल्याचा आरोप केला. याबाबतच्या बातम्या समाज माध्यम आणि दुसऱ्या दिवशी विविध वर्तमानपत्रात प्रकाशित झाल्या. वास्तविक या भूखंडाच्या व्यवहारासंदर्भात आपण कोणताही पत्रव्यवहार केला नाही. एवढेच नव्हे तर अधिकाऱ्यांना फोन कॉलही केलेही नाही. जलील यांच्या आरोपामुळे आपली प्रतिमा जनमाणसांत मलिन झाली. यामुळे व्यथित झाल्याचे नमूद केले.

संजय शिरसाट यांनी वकील राजेश रतनलाल काळे यांच्यामार्फत जलील यांच्याविरोधात मुख्य न्यायदंडाधिकारी क्रमांक ३ यांच्या न्यायालयात भारतीय न्याय संहिता कलम३५६(१),(२),३३) आणि जूना अब्रूनुकसानीचा कायदा कलम ५०० नुसार फौजदारी खटला दाखल केला. हा खटला १९ जून रोजी सुनावणीसाठी आला होता. मात्र नियमित न्यायाधीश सुटीवर असल्याने या खटल्याची पुढील सुनावणी २४ जून रोजी ठेवण्यात आली आहे.

संजय शिरसाट यांनी माजी खासदार सय्यद इम्तियाज जलील यांच्याविरोधात ज्या कलमानुसार खटला भरला आहे. यात जर जलील हे दोषी ठरले तर त्यांना २ वर्षापर्यंत शिक्षा होऊ शकते.

## उद्धव ठाकरेंचा आगामी निवडणुकीसाठी प्लॅन तयार



**मुंबई :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. या पार्श्वभूमीवर गुरुवारी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाप्रमुख आणि संपर्क प्रमुखांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. स्थानिक पातळीवर युती व आघाडीच्या शक्यतेचा अभ्यास करण्याच्या सूचनांसह, मनसेसोबतच्या युतीबाबतही ठाकरेंनी सकारात्मक भूमिका दर्शवली. राज ठाकरेंसोबत नाहीच जुळले तर? उद्धव ठाकरेंकडून बॅकअप प्लॅनिंगला सुरुवात करण्यात आली आहे. त्याचबरोबर मतदार याद्यांतील वाढ, बोगस नावे आणि निवडणूक यंत्रणेतील त्रुटींवर विशेष लक्ष देण्याचे आदेश पदाधिकाऱ्यांना देण्यात आले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या जिल्हा आणि संपर्क प्रमुखांची आज दुपारी १२ वाजता शिवसेना भवनात बैठक झाली. या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आघाडी की मनसे सोबत युती केल्याने पक्षाचा फायदा होईल, याची स्थानिक पातळीवरील नेत्यांशी चर्चा करुन येत्या एक महिन्यात अहवाल सादर करण्याचे आदेश उद्धव ठाकरे यांनी दिले आहेत.

राज्यभरात स्थानिक पातळीवर युती, आघाडी करण्यासंदर्भात आढावा घ्यावा. जर युती, आघाडी झाली नाही तर सर्व जागांवर पक्ष म्हणून लढण्यास तयार राहण्याच्या सूचना उद्धव ठाकरे यांनी दिल्या. महिन्याभरात हा अहवाल जिल्हाप्रमुख संपर्कप्रमुख यांनी द्यायचा आहे.

आगामी काळात मनसेसोबत युतीसाठी आपण सकारात्मक आहोत. मात्र, स्थानिक पातळीवर युती, आघाडी संदर्भात आढावा घेऊन माहिती द्या, अशा सूचना उद्धव ठाकरे यांनी जिल्हाप्रमुखांना दिल्या आहेत. स्थानिक पातळीवर कुठे आघाडी, युती करायची याबाबतचा निर्णय पक्ष घेईल. त्यामुळे महिन्याभरात हा अहवाल जिल्हाप्रमुख संपर्कप्रमुख यांनी देण्याच्या सूचना केल्या आहेत.

उद्धव ठाकरे यांनी मतदार याद्यांमधील संशयास्पद वाढीबाबत कार्यकर्त्यांना माहिती संकलनाचे आदेश दिले आहेत. मतदार याद्यांचा अभ्यास करा, लोकसभेनंतर विधानसभा निवडणुकीत मतदार कसे वाढले? कुठे वाढले? बोगस मतदार शोधा? गटप्रमुखांनी ४० लाख मतदार कसे वाढले हे तपासा, मतदार याद्यांच्या घोळाबाबत माहिती समोर आणा अशा सूचना उद्धव ठाकरेंनी केल्या आहेत.

## तेजस्वी घोसाळकर यांचा भाजप प्रवेश निश्चित? : मुंबई जिल्हा बँकेच्या संचालकपदी झाली नियुक्ती

**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते विनोद घोसाळकर यांच्या स्नुषा तेजस्वी घोसाळकर यांची मुंबई जिल्हा बँकेच्या संचालक मंडळावर नियुक्ती झाली आहे. त्यामुळे ठाकरे गटावर कथित नाराज असणाऱ्या तेजस्वी यांचा भाजपमध्ये प्रवेश निश्चित झाल्याचा दावा केला जात आहे.

तेजस्वी घोसाळकर या गत काही महिन्यांपासून ठाकरे गटावर नाराज असल्याची चर्चा आहे. त्यांनी मध्यंतरी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली होती. त्यात त्यांची नाराजी दूर झाल्याचे समजले जात होते. पण शुक्रवारी अचानक त्यांची मुंबई जिल्हा बँकेच्या संचालकपदी नियुक्ती झाल्याने त्या भाजपच्या वाटेवर असल्याची चर्चा नव्याने सुरू झाली. भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, दिवंगत अभिषेक घोसाळकर हे मुंबई बँकेच्या संचालकपदी होते. त्यांच्या जागी आता त्यांच्या पत्नी तेजस्वी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रवीण दरेकर यासंबंधी म्हणाले, अभिषेख घोसाळकर हे मुंबई बँकेचे संचालक होते. त्यांच्या हत्येनंतर रिक्त झालेल्या जागेवर नेमणूक करण्याचा अधिकार संचालक मंडळाला असतो. त्यानुसार सद्भावना म्हणून संचालक मंडळाने एकमताने तेजस्वी घोसाळकर यांची संचालक म्हणून बँकेवर नियुक्ती केली. ही रिक्त जागा भरणे कायदेशीररित्या क्रमप्राप्त होते. त्यानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे मुंबै बँक ही मुंबईतील सहकार क्षेत्रातील एक अग्रणी बँक आहे. या बँकेच्या संचालक मंडळावर भाजप, राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना ठाकरे गट आदी विविध पक्षांचे नेते आहेत. पण तेजस्वी घोसाळकर यांची नियुक्ती ऐन मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर करण्यात आल्यामुळे भाजपने तेजस्वी यांच्या माध्यमातून उद्धव ठाकरे यांना झटका देण्याची व्यूहरचना आखल्याचे स्पष्ट होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २१ जून २०२५


## दौलताबाद पोलिसांनी सळया चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीच्या मुसक्या आवळल्या





**दौलताबाद (जावेद अहमद)** :दौलताबाद पोलिसांनी सळ्या चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीच्या मुसक्या आवळल्या साडे चार लाखाचे मुद्देमाल जप्त केलेकरोडी शिवरात आरटीओ ऑफिस जवळ गट क्रमांक 24 मध्ये संदीप शेषराव जाधव यांची शेती असून त्या शेतीमधून तीन लाख 39 हजार पाचशे सहा रुपये किमतीचे बांधकामासाठी लागणारी लोखंडी सळ्या /रॉड/ अज्ञात चोरट्यांनी दि.२७ मे ते २९ मे महिन्याच्या दरम्यान चोरून नेले होते या चोरीचा गुन्हा पोलीस स्टेशन मध्ये दाखल करण्यात आला होता त्यात दौलताबाद पोलिसांनी दि१६ मंगळवारी रोजी एका चोरास जेर बंद केले व त्याच्याकडून दोन लाख किमतीचा महिंद्रा पिकअप व दोन लाख साठ हजार रुपये किमतीचा लोखंडी सळ्या जप्त केल्या.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार करोडी शिवरा आर.टी.ओ ऑफिस जवळ गट नंबर 24 मध्ये संदीप शेषराव जाधव यांचे शेती असून ते करोडी गावात राहतात त्यांच्या शेतात बांधकामासाठी लागणारी लोखंडी सळया होत्या त्या दि २७ मे ते २९ मे या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी चोरून गेले होते संदीप यांच्या फिर्यादीवरून दौलताबाद पोलीस स्टेशन मध्ये चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता त्याच्या तपास पोलीस निरीक्षक रेखा लोंढे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक वसंत शेळके हे करीत होते त्यांनी तंत्रशुद्ध पध्दतीने तपास करत धुळे सोलापूर महामार्गावरील करोडी ते अंबड पर्यंत अनेक धाब्यांचे सीसीटीव्ही कॅमेरे तपासणी त्यात त्यांना यश आले व त्यादिवशी अंबड येथून एक पिकअप गाडी करोडी येथे आल्याचे शेळके यांच्या निदर्शनास आले पोलीस उपनिरीक्षक वसंत शेळके व पोलीस अंमलदार सुनील गुसिंगे, ज्ञानेश्वर कोळी ,संदीप सौर यांनी अंबड गाठून चोरीतील आरोपीच्या मुसक्या आवळल्या व चोरीत वापरण्यात आलेली महिंद्रा पिकप जीप व चोरीस गेलेले लोखंडी सळया जप्त केल्या

## पोलीस मानकोबा कुंभार याचा सत्कार



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा येथील श्री.छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आज दि.20 जून 2025 रोजी महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ संजय अस्वले यांनी कॅडेट मानकोबा कुभांरचा महाराष्ट्र पोलीस दलात भरती झाल्यामुळे त्याचा अभिनंदन व सत्कार केला . तो राजेगाव येथील असुन वडिल शेतकरी अत्यंत गरिब , हालाकिच्या परिस्थितुन मानकोबाला शिक्षण दिले . लहान पणापासुनच अंगी जिद , चिकाटी , खेळाडुवृत्ती असल्यामुळे पोलीस होण्याचे स्वप्न व अंगावर खाकी वर्दी घालावी ही उमेद उराशी बाळगुण खुप मेहणत घेऊन तो आज चंद्रपुर जिल्हयामध्ये पोलीस विभागात कार्यरत आहे . पदवीचे बीएसी व एनसीसी चे शिक्षण घेण्यासाठी तो उमरगा येथील श्री छ शिवाजी महाविद्यालयात प्रवेश घेतला त्याने या संधीचे सोन केल. शाळा ,महाविद्यालयात शिक्षण घेत असताना सुद्धा त्याने मैदानी धावणे स्पर्धेत विभागीय, विद्यापीठ, राज्यस्तरीय , स्पर्धेमध्ये यश संपादन केले . स्वतःच्या स्वबळावर जिद्य , मेहनत, कठोर परिश्रम , अभ्यास आत्मविश्वासाच्या बळावर त्यांने हे यश संपादन केले . त्याबदल प्राचार्य डॉ संजय अस्वले यांनी त्याच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या . कॅडेटसनी मानकोबाचा आदर्श समोर ठेऊन आपल्या महाविद्यालयीन शिक्षणा सोबत स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करून वेगवेगळ्या पदावर जाऊन आपले नावलौकिक सिद्ध करून दाखवावे असे यावेळी त्यांनी प्रतिपादन केले. यावेळी डॉ विलास इंगळे डॉ.पद्माकर पिटले , प्रा गुंडाबापू मोरे , प्रा शैलेश महामुनी , श्री नितीन कोराळे , राजकुमार सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ गिरीधर सोमवंशी यांनी तर आभार डॉ विनोद देवरकर यांनी मानले. या यशा बदल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल भैया मोरे, उपाध्यक्ष अश्लेष भैया मोरे यांनी मानकोबास अभिनंदन करून भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या .या कार्यक्रमाला प्राध्यापक, प्राध्यापिका , शिक्षकेत्तर कर्मचारी ,एनसीसी कॅडेट व विद्यार्थी उपस्थित होते.

## 'ग्रंथालय धोरण समिती'त डॉ. राजशेखर बालेकर



**छत्रत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आणि शासकीय ग्रंथालयांचे बळकटीकरण डिजिटलायजझेशनने, व आधुनिकीकरणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य ग्रंथालय धोरण तयार करण्यासंदर्भात शासनास शिफारस करण्यासाठी " ग्रंथालय धोरण समिती" गठित करण्यात आली आहे. या समितीत मराठवाड्यातील ग्रंथालय चळवळीत प्रदीर्घकाळ सक्रीय असलेले ग्रंथालयशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉ. राजशेखर शंकरराव बालेकर यांची सदस्य म्हणून शासनाने नियुक्ती केली आहे. डॉ. राजशेखर बालेकर हे सेवानिवृत्त सहाय्यक ग्रंथालय संचालक असून महाराष्ट्राच्या ग्रंथालय चळवळीत त्यांची मोलाचे योगदान आहे. सध्या ते ग्रंथालय भारती (नागपूर)चे अध्यक्ष असून छत्रपती संभाजीनगर येथील जीवनविकास ग्रंथालयाचे कार्यवाह म्हणून सेवारत आहेत. त्यांच्या ग्रंथालय क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभवांचा धोरण ठरविण्यासाठी निश्चितच फार मोठा फायदा होईल. जीवनविकास ग्रंथालयाचे अध्यक्ष न्या. अंबादासराव जोशी, कोषाध्यक्ष नितीन कंधारकर, सहकार्यवाह नृसिंह कुलकर्णी, संपूर्ण कार्यकारिणी आणि जीवनविकास ग्रंथालयाच्या वाचकांनी डॉ. बालेकर यांचे अभिनंदन केले आहे


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact : 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २१ जून २०२५


## आयुक्त जी. श्रीकांत यांच्या हस्ते महेक परवीन यांचा गौरव



**छत्रपती संभाजीनगर :** आयुक्त तथा प्रशासक मा. श्री. जी. श्रीकांत सर यांच्या वाढदिवसानिमित्त मनपा केंद्रीय प्राथमिक शाळा मुकुंदवाडी तील इयत्ता आठवीची विद्यार्थिनी महेक परवीन जिने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून अल्प कालावधीत सेक्सोफोन वाद्य वाजविण्यावर कौशल्य प्राप्त केले त्याबद्दल मा. आयुक्त महोदय यांनी कुटुंबीयासह त्यांच्या शुभहस्ते सेक्सोफोन वाद्य भेट देवून तिचा गौरव केला. याप्रसंगी उपायुक्त मा. श्री. अंकुश पांढरेसाहेब, मा. श्री. गणेश दांडगे, शिक्षणाधिकारी मा. श्री. भारत तीनगोटे, कार्यक्रम अधिकारी मा. श्री. ज्ञानदेव सांगळे, शाळेचे मुख्याध्यापक श्री के. बी. चौधरी, श्री सचिन गायकवाड आणि संगीत प्रशिक्षक श्री सुभाष खिल्लारे उपस्थित होते.

## कँनटेंर उचलणारे कलवार मशीनला लागली आग





**दौलताबाद (जावेद अहमद) :** कँनटेंर उचलणारे कलवार मशीन मध्ये रात्री साडे आठ वाजता अचानक आग लागली ही बाब मशीन ऑपरेटर ला कळताच त्याने ही माहिती सर्वेअर। सचिन वानखेडे यांना दिली त्यांनी पोलीस पाटील प्रमोद साठे यांना दिली साठे यांनी 112 नंबर ला माहिती देऊन दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये ही माहिती दिली पोलिसांनी अग्निशमन माहिती दिली अग्निशमन दाखल होऊन आग विझविण्यासाठी प्रयत्न सुरु होते ही बाब मॅनेजर ने कोणाला माहिती कळावी नाही म्हणून घटने स्थळ पासून प्रसार माध्यमांना थांबवण्यात आलेकॉन्व्हर मशीन जुने असल्याने वेळोवेळी दुरुस्ती करून कँनटेंर उचलण्याचे काम सुरू होते असल्याची माहिती मिळाली कोट्यवधी रुपयांची संपत्ती येथे असून सुद्धा मग जुन्या मशीन कशिकाय वापरले जाते हा एक प्रश्न उपस्थित होतेया आगीमुळे किती प्रमाणात नुकसान झाले आहे हे कळले नाहीया डीपो मध्ये रेल्वेने आंतरराष्ट्रीय स्तरावरील माल येथे येतो येथून महाराष्ट्र भर वितरण करण्यात येतेया कामाचे ठेका हरियाणा येथील प्रेमचंद अँड कंपनी कडे असल्याची माहिती मिळाली. अग्निशमन दलाचे सूरज राठोड, शिवसंभा कल्याणकर, अमिताभ कराड, दीपक गाडेकर, विक्रांत बकले, स्तवधर सोनभाऊ, अजिनाथ खिल्लारे यांनी उशिरा पर्यंत आग आटोक्यात आणली

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी हिवाळी शिबिरादरम्यान बांधलेला गॅबियन बंधारा





बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी मौजे गोंदेगाव ता. जि. जालना येथे दि. १७ ते २४ जानेवारी २०२५ हिवाळी शिबिरादरम्यान बांधलेला गॅबियन बंधारा. आज दि. २० जून २०२५ रोजी पावसाच्या पाण्याने ओसंडून वाहत आहे. विद्यार्थ्यांनी केलेल्या परिश्रमाचे फलित (पाणी आडवा पाणी जिरवा..)या निमित्ताने दिसून येते. या बंधाऱ्यासाठी आर्थिक सहकार्य कालिका स्टीलचे संचालक श्री.अरुणजी अग्रवाल यांनी मदत केली. महाविद्यालयाच्या प्राचार्य कविता प्राशर, कार्यक्रमाधिकारी डॉ. उद्धव थोरवे, डॉ. बी. बी. सले, अभिजीत भुतेकर, प्रा. प्रियदर्शन भवरे, डॉ. क्षमा अनभुले, श्रीमती अश्विनी संदीप वाघ, सरपंच, गोंदेगाव श्री. साहेबराव उत्तमराव वाघ उपसरपंच, गोंदेगाव, श्री.संदीप विठ्ठलराव वाघ संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती,जालना, यांनीही याकामी सहकार्य केले. श्री. राजेंद्रजी बारवाले, डॉ. उषा झेर, मा. सुरेशजी अग्रवाल यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

## गटशिक्षण अधिकारी मनीष दिवेकर यांचा सत्कार



**कन्नड (कृष्णा शिंदे) :** नवीन रुजू झालेले कन्नड तालुक्यातील गटशिक्षण अधिकारी मनीष दिवेकर यांचा सत्कार करताना जि प प्रशाला कन्नडचे मुख्याध्यापक दिलीप गायकवाड व रेलचे मुख्याध्यापक व तालुका क्रीडा संकुल समिती समन्वयक प्रवीण शिंदे कार्यालयीन अधीक्षक अशोक जाधव रेल दांड्याचे मुख्याध्यापक संदीप गुंजाळ कन्नडचे डाटा ऑपरेटर रवींद्र फरकाडे व प्राध्यापक मोबीन पटेल आदि उपस्थित होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २१ जून २०२५

# यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ माजी विद्यार्थी संघाचे ५ लाख सदस्यसर्वाधिक नोंदणी असलेले देशातील पहिले राज्य विद्यापीठ

**नाशिक (प्रतिनिधी) :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या माजी विद्यार्थी संघाने पाच लाख माजी विद्यार्थी सदस्य नोंदणीचा टप्पा पार केला आहे. संघ स्थापना झाल्यापासुन गेल्या पावणेपाच वर्षाच्या कालखंडातच या माजी विद्यार्थी संघाकडे आजतागायत तब्बल ५ लाख ६ हजार ८५७ विद्यार्थ्यांनी सदस्यता नोंद केलेली आहे. विशेष म्हणजे भारतातील सर्व विद्यापीठांच्या तुलनेत सर्वाधिक माजी विद्यार्थी सदस्य नोंदणी असलेले यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे देशातील पहिले राज्य विद्यापीठ ठरले आहे. यामुळे 'ज्ञानगंगा घरोघरी' हे ब्रीद घेवून वाटचाल करणाऱ्या विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. सन १९८९ मध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर आजतागायत सुमारे ५५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी विविध शिक्षणक्रमांच्या पदव्या प्राप्त केलेल्या आहेत. सन २०२० मध्ये विद्यापीठात माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली. त्यात सामील होण्यासाठी विद्यापीठाने आपल्या विद्यार्थ्यांना https://www.ycmoualumni.org हे संकेतस्थळ उपलब्ध करून दिले. त्यात त्यांनी कोणत्या विद्याशाखेतून कोणता शिक्षणक्रम कधी पूर्ण केला, सध्या ते कोणत्या आस्थापनेत कोणत्या पदावर काम करत आहेत, याबाबतची माहिती देत सदस्य होण्याचे आवाहन केले होते. माजी विद्यार्थी संघाचे सरचिटणीस डॉ. संतोष साबळे यांच्याकडे या विभागाची धुरा देण्यात आली होती. डॉ. साबळे यांनी माजी विद्यार्थी संस्थेची धर्मादाय आयुक्त कार्यालयात रीतसर नोंदणी करून घेतली. १० सप्टेंबर २०२० रोजी विद्यापीठाच्या माजी विद्यार्थी संघास नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाले. यानंतर माजी विद्यार्थ्यांचा शोध घेत त्यांना सदस्य होण्यासाठी आवाहन केले गेले. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत माजी विद्यार्थ्यांचे संघटन वाढविण्यावर भर देण्यात आला. तसेच त्यांच्या निरनिराळ्या अडचणी सोडवण्यास प्राधान्य दिले. प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पीएचडी असे विविध शिक्षणक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या सुमारे ५ लाख ६ हजार ८५७ एवढी झाली आहे. विद्यार्थ्यांचा डेटा संस्थेच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आला आहे. आजवर माजी विद्यार्थी संघाला बळ देण्यासाठी माजी कुलगुरू डॉ. अरुण जामकर, डॉ. माणिकराव साळुंके, प्रा. ई. वायुनंदन तसेच कुलसचिव डॉ. दिनेश भोंडे, डॉ. प्रकाश देशमुख, भटूप्रसाद पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य मिळाले. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना आणखी मोठ्या प्रमाणात विद्यापीठाशी जोडण्यासाठी जगभरातील माजी विद्यार्थांचा लवकरच मेळावा आयोजित करण्याचा मनोदय असल्याचे संस्थेचे अध्यक्ष तथा विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड यांनी सांगितले. विद्यार्थ्यांची नोंदणी वाढविण्यासाठी कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्यासह संस्थेचे सदस्य तथा व्यवस्थापन मंडळाच्या सदस्या डॉ. संजीवनी महाले, उपाध्यक्ष डॉ. गोविंद कतलाकुटे, खजिनदार कविता देव, डॉ. नितीन ठोके, विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक डॉ. प्रकाश देशमुख, धावपटू कविता राऊत, राहुल खैरनार यांचेही उत्तम सहकार्य लाभले. दरम्यान, मुक्त विद्यापीठातून कोणताही शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनी https://www.ycmoualumni.org संकेतस्थळास भेट देवून आपली नोंदणी करावी असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

**प्रतिक्रिया :** माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने राज्यभर उपक्रम राबविणार विद्यापीठाचे माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. माजी विद्यार्थ्यांची नाळ विद्यापीठाशी जोडली जावी, त्यांची एकमेकांशी ओळख व्हावी, विद्यापीठाच्या विविध उपक्रमांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचावी, नवीन विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी त्यांचा फायदा व्हावा या उद्देशाने माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली. आज या माजी विद्यार्थी संस्थेचे ५ लाख ६ हजार ८५७ एवढे सदस्य आहेत. याचा मनस्वी आनंद वाटतो. आगामी काळात विद्यापीठातर्फे माजी विद्यार्थ्यांसाठी अनेक भरीव उपक्रम राज्याच्या विविध भागात राबविण्यात येतील. —



**प्रा. संजीव सोनवणे,**
कुलगुरू यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

**विद्यार्थ्यांच्या यशोगाथा प्रेरणादायी**

विद्यापीठात रुजू झाल्यापासून विद्यापीठाच्या विवध क्षेत्रातील माजी विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी सोडवत गेलो. विद्यापीठाच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने माजी विद्यार्थ्यांच्या यशोगाथा पुस्तिकेची निर्मिती केली. नंतर माजी विद्यार्थी संस्थेची जबाबदारी विद्यापीठाने सोपवली होती. गेल्या पावणेपाच वर्षात पाच लाख माजी विद्यार्थ्यांची सदस्यता नोंदणी करता आली, याचा मोठा आनंद आहे.



**डॉ. संतोष साबळे,**
सरचिटणीसमाजी विद्यार्थी संघ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

# आरोप-प्रत्यारोप थांबणार कधी? : उद्धव ठाकरेंना उत्तर देताना नीतेश राणे यांची जीभ घसरली



**मुंबई :** उद्धव ठाकरे यांना उत्तर देताना आज नीतेश राणे यांची जीभ घसरली. त्यांनी अत्यंत खालच्या शब्दांत आदित्य ठाकरे यांच्यावर टीका केली. स्वतः:चा मुलगा कसा आहे, हे त्यांना माहिती आहे. त्यामुळे मला पेंग्विन बोलून फरक पडत नाही. स्वतः:च्या मुलाची अवस्था बघा. आमचे तोंड उघडायला लावू नका. आधी स्वतः:च्या मुलाची अवस्था बघा. मौलवींना खूश करण्यासाठी उद्धव ठाकरे टीका करतात, असेही नीतेश राणे म्हणालेत.

उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी पक्षाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात बोलताना, उंची पेंग्विनची, चाल बदकाची आणि आवाज कोंबडीचा अशी टीका नीतेश राणे यांच्यावर केली होती. आज नीतेश राणेंनी पत्रकार परिषद घेऊन उद्धव ठाकरेंच्या टीकेला उत्तर देत जोरदार पलटवार केला आहे.

मला शिव्या देणे हिंदुत्वाचे काम करणारा कार्यकर्ता खटकतोय, कुणी हिंदू समाजासाठी उभा राहतोय, हे त्यांना खटकतेय. हा बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराचा अपमान आहे. हे उद्धव ठाकरेंना कळत नाही. बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुत्वाला साथ दिली त्यामुळे त्यांनी ठाकरे ब्रँड मोठा केला. पण त्यांच्या पुढील पिढीने हे धुळीस मिळवले असल्याचे नीतेश राणे म्हणाले.

यावेळी नीतेश राणे यांनी उद्धव ठाकरेंनी वर्धापन दिनाच्या कार्यक्रमातून केलेल्या टीकेलाही उत्तर दिले. स्वत: चा मुलगाच असा असल्यामुळे त्यांना बाकी सगळे पेंग्विन, कोंबडा असे दिसणार, त्यांना त्यांच्या मुलाची चिंता आहे, आवाज पाहिला की बाई आहे की पुरूष आहे कळत नाही. म्हणून आमचे तोंड उघडायला लावू नका, आपल्या मुलाची अवस्था पाहा, असे नीतेश राणे म्हणाले.

मी डिनो मॉरिओबद्दल माहिती देतोय, दिशा सालियन प्रकरणाची माहिती देतोय, त्यामुळे त्यांना माझा राग येणे साहजिक आहे. पण स्वत: च्या मुलाची थेर कमी केली असती, नाइटलाईफचे काम कमी केले असते तर आजही वेळ आली नसती. उलट ते माझ्याबद्दल बोलले त्याचा मला अभिमान असल्याचे म्हणत हिंदूच्या गब्बरची दखल घेतली की नाही? असा टोलाही राणेंनी लगावला.

नीतेश राणे यांनी यावेळी दोन्ही ठाकरे बंधूंच्या युतीच्या चर्चांवरही प्रतिक्रिया दिली. राज्याच्या हितासाठी ते भांडले नव्हते, त्यांचे कौटुंबिक भांडण होती. लग्नामध्ये एकत्र येतात, तुम्हाला विचारून येतात का? एकाकडे शून्य आमदार आणि एकीकडे २० आमदार काय होणार? मुंबईत हिरवे झेंडे दिसणार नाही, भगवे दिसणार आहे. वरळी सांभाळता आली नाही, आमदारकीला काठावर पास झालेला विद्यार्थी मुंबई लढवणार का? आदित्यला अधिकृत जाहीर करा, आम्ही महापौर जाहीर करतो, असे राणे म्हणाले.

हिंदू-मुस्लीम भांडण लावायचे काम सुरू आहे. एक बेडूक त्यासाठी ओरडतोच आहे. त्याला तेवढेच काम दिलेले आहे. अरे तुझी उंची केवढी, तुझा आवाज कसा? उंची पेंग्विनची, चाल बदकाची, आवाज कोंबडीचा, डोळे कोणासारखे आहेत, माहिती नाही. तुझी पार्श्वभूमी काय? वडिलांची पार्श्वभूमी काय? आणि आमच्यावर बोलतोस. एक कुणीतरी बाप ठरवा. अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी नीतेश राणे यांच्यावर टीका केली होती.

